राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - ११ जानेवारी, २०१२.

## परिपत्रक

आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन येत असल्यामुळे संबंधित महानगरपालिकेमध्ये महापौरांना, जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती व ग्रामपंचायतींचे सरपंच यांना ध्वजारोहण करता येईल का, याबद्दल राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा होत आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की आचारसंहितेच्या कलम १४ नुसार अश्या कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींची उपस्थिती असण्यास हरकत नाही. मात्र कार्यक्रमाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच समारंभात करावयाची भाषणे बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरती मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रचाराची भाषणे करण्यात येणार नाहीत व आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण ) ११/१/१२
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर

सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी